
# विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम-अमंगळ।।





**टाळी वाजवावी गुढी उभारावी। वाट ती चालावी पंढरीची।।**

अशी आळवणी करीत लाखो वारकरी पंढरपूरच्या दिशेने निघाले आहेत. मराठी मातीच्या कणाकणातून विठूनामाचा गजर उचंबळून येत आहे. भक्तीरसाच्या या कल्लोळात जात-धर्म, गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष हे सर्व भेद गळून पडत आहेत आणि निर्मळ माणूसपणाचा आविष्कार पाहायला मिळत आहे. वारकरी पंथाची सुरूवात संत नामदेव महाराजांनी केली. संत ज्ञानेश्वर महाराज या संप्रदायाचा पाया बनले तर संत तुकोबाराय 'कळस' झाले. शेकडो वर्षांपासून कर्मकांड, जातीभेद, स्त्रीदास्य व अंधश्रद्धांच्या अंधारात खितपत पडलेल्या समाजाला वारकरी संतांनी नवी प्रकाशमय वाट दाखवली. ही वाट आहे समतेची, बंधुतेची, एकतेची. संतांचे हेच विचार पुढे भारतीय संविधानात आले.

## समतेचा क्रांतिकारी विचार



तथाकथित शुद्रातिशुद्र व स्त्रियांसोबत भेदभाव करणारा विषमतावादी विचार संतांनी स्पष्टपणे नाकारला. ज्ञान मिळवण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे, असे गर्जून सांगितले. तुकोबा म्हणतात,

**सकळांसी येथे आहे अधिकार । कलियुगी उद्धार हरीच्या नामे ॥**
**ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य, शुद्र चांडाळाही अधिकार । बाळे नारी नर आदि करोनी वेश्याही ॥**

प्रत्येक मनुष्यात ईश्वराचा अंश आहे. त्यामुळे जन्मावरुन होणारा भेदभाव चुकीचा आहे, असा विचार भागवत धर्माने मांडला. म्हणूनच या परंपरेत सर्व जातीधर्मांचे संत आहेत; अगदी एका वेश्येची मुलगी संत कान्होपात्रा देखील आहेत.

## 'भक्तीचा खेळ' वाळवंटात

तथाकथित अस्पृश्य लोकांनाही भक्तीचा अधिकार मिळावा, यासाठी नामदेव महाराज व ज्ञानेश्वर माऊलींनी भक्तीचा खेळ चंद्रभागेच्या वाळवंटात मांडला. तुकोबाराय याचे वर्णन करतात,

**खेळ मांडीयेला वाळवंटी घाई । नाचती वैष्णव भाई रे ॥**
**क्रोध अभिमानी केला पावटणी । एक-एका लागतील पायी रे ॥**

क्रोध, अभिमान यांना पायदळी तुडवून, जातीचा अहंकार विसरून सर्वजण एकमेकांच्या पाया पडू लागले. संतांनी अस्पृश्यांसहित सर्वांना 'माऊली' बनवले. ही ताकद आहे संतविचारांची!

## संत विचारातील 'स्त्री-पुरुष' समानता



स्त्रिया स्वातंत्र्याच्या लायकीच्या नाहीत - हा कर्मठ विचार वारकरी संप्रदायाने नाकारला. शेकडो वर्षांपासून स्त्रियांना शिक्षणाचा, भक्ती करण्याचा अधिकार नव्हता. वारकरी संप्रदायाने स्त्रियांना संतपण बहाल केले. म्हणूनच जनाबाईसारखी घरकाम करणारी, सोयराबाईसारखी गावकुसाबाहेर राहणारी, वेश्येची मुलगी कान्होपात्रा, समाजाने बहिष्कृत केलेली मुक्ताबाई - यांसारख्या स्त्रियाही संतपदी पोहोचू शकल्या. संत नामदेव पंजाबला गेलेले असताना २०वर्षे वारकरी संप्रदायाचे नेतृत्व जनाबाईंनी केले. विठूभक्तीने त्यांच्यात पुरूषप्रधान समाजासोबत लढण्याची शक्ती आली. म्हणूनच जनाबाई म्हणतात,

**डोईचा पदर आला खांद्यावरी । भरल्या बाजारी जाईन मी ॥**
**हातामध्ये टाळ खांद्यावरी वीणा । आता मज मना कोण करी ॥**

## संतांनी 'धर्मा'चा अर्थही सांगितला

नीतीमत्तेवर उभा आहे तोच धर्म, असा संदेश आपले संत देतात. भागवत धर्माचे सार सांगताना तुकोबाराय म्हणतात,

**विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ॥**

**तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुख दुख भोग जीव पावे ॥**

म्हणजे, आम्हा वैष्णवांचा जो धर्म आहे, त्यात कोणत्याही भेदभावाला कसलीही जागा नाही. आपण सर्वजण एकाच शरीराच्या वेगवेगळ्या अवयवांसारखे आहोत. म्हणूनच, जर एकालाही दुःख झालं तर त्याची कळ समाजातल्या प्रत्येकाला जाणवायला पाहिजे, अशी 'बंधुतेची' शिकवण तुकोबा देतात.

## वारकरी संप्रदायातील 'सर्वधर्म समभाव'



वारकरी संप्रदाय जसा सर्व जातींचा आहे तसाच सर्व धर्मांचाही आहे. ही शिकवण देण्यासाठी संत तुकोबाराय लिहितात,

**यातायाति धर्म नाही विष्णुदासा । निर्णय हा ऐसा वेदशास्त्री ॥**

'वैष्णव' कोण-कोण आहेत हेसुद्धा ते सांगतात,

**कबीर मोमीन, लतिफ मुसलमान । सेना न्हावी जाण विष्णुदास ॥**

वारकरी संप्रदायात कबीर, लतीफशाह, शेख महंमद हे संत झाले आहेत. तसेच शेकडो मुस्लिम सत्पुरुष होऊन गेले. आजही अनेक मुस्लिम किर्तनकार खांद्यावर भागवत धर्माचा झेंडा घेऊन प्रबोधन करत आहेत. तुकोबांची पालखी देहूतून निघाल्यावर पहिला विसावा घेते ती जागा आहे – हज़रत सय्यद अनगढशहा बाबांचा दर्गा. ते तुकोबांचे शिष्य होते. आपल्या वारकरी परंपरेत अशी बंधुतेची व एकतेची हजारो उदाहरणे सापडतात.

## संतविचार स्वराज्यात आणि भारतीय संविधानात आले



छत्रपती शिवाजी महाराजांनी वारकरी संतांचा विचार आणि झेंडा घेऊन राज्यकारभार केला. अठरापगड जाती-धर्माच्या लोकांना सोबत घेतले, सर्व धर्मांचा सन्मान केला, शेतकऱ्यांच्या कल्याणाची धोरणे आखली, महिलांचा आदर राखला. छ. संभाजी महाराजांनी हाच वारसा पुढे चालवला. वारकरी परंपरेचा सन्मान करत संत तुकोबारायांच्यादिंडीला संरक्षण दिले. याच विचारांवर चालत महात्मा फुले व राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी दलित-बहुजनांच्या कल्याणासाठी कार्य केले. हाच विचारांचा वारसा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखणीतून भारतीय संविधानातही आला. म्हणूनच भारतीय संविधान हे वारकरी परंपरेचा तसेच शिव-फुले-शाहू आंबेडकरी विचारांचा अप्रतिम संगम आहे.

संविधानाचा विचार प्रत्येकापर्यंत पोहोचवण्यासाठी 'संविधान जागर अभियान' सुरू करण्यात आले आहे. तुम्हीही यामध्ये सहभागी व्हा, असे प्रेमपूर्वक आवाहन!चला तर मग, समता, न्याय, बंधुता, स्वातंत्र्य, जनतेच्या कल्याणाचा संतविचार जपूया, पसरवूया आणि वाढवूया.

---


# संविधान जागर अभियान

स्वप्निल फुसे: 79723 45764 | नागार्जुन वाडेकर: 98602 39899 | राजाभाऊ करवाडे: 98222 02739

samvidhanjagar.org